# हिरवे पुणे

● प्रकाश गोळे

१९६१ साली पुण्याचे 'पानशेत' झाले आणि शहराच्या मध्य-भागाची मोठी वाताहात झाली. नदीकाठची अनेक घरे पडून तेथे राहणाऱ्या कुटुंबांचे कुठे पुनर्वसन करायचे असा प्रश्न निर्माण झाला, शासनाने पूररेषा आखून ती रेषा आणि नदी यांच्या पट्ट्यात घर बांधणी होऊ द्यावयाची नाही असा निर्णय घेतला खरा, पण तो घाईचा ठरला आणि त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. पानशेतग्रस्त कुटुंबांच्या पुनर्वसनाच्या अनेक योजना पुढे आल्या. त्या-पैकी काही राबविल्या गेल्या पण शहर–विस्ताराची सर्वंकष योजना नसल्याने पुनर्वसन आणि शहरातील इतर सुविधांची वाढ, यांचा मेळ बसलाच नाही, त्यामुळे 'पानशेत' नंतर शहराचा विस्तार अनियंत्रित आणि विस्कळीत स्वरूपांत झाला,

शहराचा विस्तार होत असताना शहराच्या आरोग्याच्या आणि सौंदर्याच्या दृष्टीने मोकळ्या जागा विविक्षित ठिकाणी राखणे आवश्यक आहे, या गोष्टीकडे पुण्यात अजिबात दुर्लक्ष झाले. नवीन घर बांधताना प्लॉटपैकी एक–तृतीयांश जागाच बांधणे आणि सहकारी सोसायटयांना काही मोकळी जागा ठेवण्याचे बंधन घालणे, यामुळे ज्या जागा मोकळ्या राहिल्या असतील त्या, आणि घरबांधणी अशक्य असल्याने ज्या जागा मोकळ्या राहिल्या असतील त्या, एवढ्याच मोकळ्या जागा पुण्यात शिल्लक राहिलेल्या आता दिसतात.

पुण्याच्या सभोवती असलेल्या टेकड्या सुदैवाने अजूनही पुष्कळशा मोकळ्या आहेत, तिथे घरबांधणी करण्याचे किंवा तशी परवानगी सरकारकडे मागण्याचे प्रयत्न झाले नाहीत असे नाही. काहींना त्या बाबतीत यशही मिळाले आहे. हनुमान टेकडीच्या पश्चिमेकडील उतारावर एका शिक्षण–संस्थेने ठाण मांडले आहे, वेताळ टेकडीच्या मागे एक संशोधन–संस्था अवतरली आहे, पर्वतीचे उत्तर आणि पूर्व उतार झोपड्यांच्या कचाट्यात सापडले आहेत, अरण्येश्वर ते पर्वती या भागातही टेकड्यांच्या उतारावर घरबांधणी झाली आहे आणि येरवड्याजवळची पर्णकुटीची टेकडीही घरांनी व्यापली आहे.


टेकड्याशिवाय शहरात काही शिक्षण व इतर संस्थांची क्रीडांगणे आहेत. पण प्रत्येक शिक्षण–संस्थेला क्रीडांगण नाही. खुद्द पुणे विद्या-पीठाचे स्वतःचे असे सुसज्ज क्रीडांगण नाही. क्रीडांगणाचाही काही भाग इमारतींनी व्यापलेला आहेच.

पूर्वी पुणे कॅन्टोनमेंट विभागात मोठ्या मोकळ्या जागा होत्या. त्यांपैकी पुष्कळशा बंगल्यांची प्रशस्त आवारे आता नव्या 'अपार्टमेंट' नी व्यापली आहेत. गोळीबार मैदानासारखें मैदानही आता मोकळे राहिलेले नाही. लष्कराच्या ताब्यातील मोकळ्या जागावर अर्थातच पुण्यातील नागरी यंत्रणेचा अधिकार चालत नाही.

तेव्हा सध्या उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागा इमारतींनी व्यापल्या जाऊ नयेत, त्यांचा योग्य उपयोग व्हावा. यासाठी काय सुचविता येते ते पाहू.

१. टेकड्यांवर घरबांधणी होऊ नये. याबाबतीत दुमत असण्याचे कारण नाही.

पाषाण तलावाचा सुंदर परिसर



टेकड्या सर्व नागरिकांच्या उपयोगासाठी खुल्या राखायला हव्या. मात्र ज्या टेकड्या सध्या अगदी उघडाबोडक्या आहेत. त्यावर झाडे लावली पाहिजेत. सरकारी वनविभागातर्फे सध्या पाचगाव–पर्वती आणि वेताळ टेकडीवर झाडे लावण्याचे काम सुरू आहे. असेच झाडे लावण्याचे काम, नॅशनल केमिकल लॅबोरेटरी समोरील, ए. आर. डी. ई. पाठीमागील पौड रस्त्यावरील कचरा डेपोजवळील, वारजे गावा-पाठी मागील, वेताळ टेकडीच्या पश्चिम उतारांवर, पर्वतीच्या दक्षिण व पश्चिम उतारावर कात्रज व बोणदेत घाटांजवळच्या टेकड्यांवर आणि राम टेकडीवर, सुरू केले जावे. चतुःश्रृंगीचा पुष्कळसा भाग खाजगी मालकीचा आहे, देवालयाभोवती जी झाडे आहेत, त्यांच्या लगतच आणखी झाडे लावण्याचे काम सुरू करता येईल. पर्वती देवस्थानने जसा झाडे लावण्यात पुढाकार घेतला आहे. तसा चतुःश्रृंगी देवस्थानने घेणे जरूर आहे.

टेकड्या जंगलांनी आच्छादिल्या गेल्या की शहराभोवती वनाचे कोंदण उभे राहील आणि शहरातील प्रदूषण कमी होण्यास, आरोग्य सुधारण्यास आणि सौंदर्यवृद्धी होण्यास हातभार लागेल.

झाडे लावण्यासाठी शहरातील विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था यांची मदत घेता येईल. पण लावलेल्या झाडांची जोपासना करणे व त्यांचे संरक्षण करणे, ही कामें वनविभाग आणि महापालिका यांनाच करावी लागतील. वृक्ष–करातून काही रक्कम टेकड्यांवरील वनांचे संरक्षण करण्यासाठी, राखणदार नेमण्यासाठी खर्ची पडायला हवी. तसेच पावसाळ्यानंतर मेंढपाळ काही टेकड्यांवर मेंढ्या चरायला सोडतात. त्यांच्याकडून झाडांना इजा पोचत नाही ना, याचीं काळजी घ्यावयास हवी, शेळ्या आणि गुरे यांची चराई बंदच करायला हवी. टेकड्यांवर निर्माण होणारे गवत ही एक उत्पन्नाची बाब ठरायला हरकत नाही.

---

**टेकड्या आणि त्यांच्या उतारावर प्लॉटस् वगैरे पाडून घरबांधणी होऊ देणे म्हणजे टेंकड्यांच्या नैसर्गिक सौंदर्यालाच नख लावणे होय. असे सर्व प्रयत्न हाणून पाडायला पाहिजेत.**

**टेकड्या जंगलांनी आच्छादिल्या गेल्या की शहराभोवती वनाचे कोंदण उभे राहील आणि शहरातील प्रदूषण कमी होण्यास, आरोग्य सुधारण्यास आणि सौंदर्यवृद्धी होण्यास हातभार लागेल.**

---

टेकड्यांवर कोणती झाडे लावायची याबाबतीत तज्ज्ञांचा सल्ला घेतला, पक्षी व प्राणी यांना उपयुक्त ठरतील अशी झाडे लावली गेली आणि झाडांमधून विहार करण्यासाठी पायवाटा आखण्यात आल्या तर या टेकड्या म्हणजे अभयारण्ये होतील व पर्यटकांना आकर्षित करू शकतील. अर्थात पर्यटकांची गर्दी आणि गोंगाट मर्यादे-बाहेर जाऊन अभयारण्यांची जत्रास्थाने होणार नाहीत, तसेच या वनांमध्ये काही बेकायदेशीर गोष्टींना 'अभय' मिळणार नाही, यांकडेही लक्ष द्यावयास हवे.

२. नदी–काठाचे नियोजन फार काळजीपूर्वक होणे आवश्यक आहे. नदीकाठ हा मोकळी हवा उपभोगण्याचे व खेळ, विहार यांचे ठिकाण हवे. पूर्वी नदीकाठी काही उद्याने होती. हिरवळी होत्या. पानशेतच्या पुरात त्या उद्ध्वस्त झाल्या. पोहोण्याचा तलावही गेला. नदीकाठावर महापालिकेतर्फे एक मोठी व्यापारी इमारत बांधली जाणार आहे. तसेच एका संस्थेसही काठावर इमारत बांधण्यास परवानगी देण्यात आली आहे. नदीकाठाचा सर्वांगीण विकास करण्याची योजनाच महा-पालिकेकडे तयार नाही असा याचा अर्थ होतो. शिवाय शहरातील ड्रेनेज ठिकठिकाणी नदीमध्ये सोडण्यात आल्याने नदीचे पाणी पूर्वी-सारखे स्वच्छही राहिलेले नाही. पानशेतच्या पुरामुळे नदीच्या पात्रात दगड–माती मोठ्या प्रमाणावर साचली ती अजून तशीच आहे; आणि तरीही नागरिक कपडे व अंग धुणे, गुरे धुणे यासाठी नदी उपयोग करतातच.

---

**नदीकाठी लगत इमारती नव्याने बांधू नयेत आणि जर बांधायच्याच ठरल्या तर त्यांची उंची व स्वरूप काठाच्या सौंदर्यास बाधा आणणारे असू नये.**

---

नदीचे सध्याचे स्वरूप लक्षात घेता तिच्या काठांचा योग्य विकास करणे सोपे नाही. पण काही गोष्टी सुचविता येतील त्या अशा : अ) पात्राच्या सीमा नक्की करण्यात याव्या, ब) पात्रातील दगड-माती दूर करून पाण्याचा प्रवाह ठराविक जागेतून व दिशेने वाहता ठेवावा. यासाठी प्रवाहाची खोली काही ठिकाणी वाढवावी लागेल. क) माणसे आणि गुरे यांना नदीपर्यंत जाता यावे यासाठी मार्ग तयार करून, त्यांच्या साठी धुण्याचे घाट बांधावे. ड) उरलेल्या पात्रात हिरवळी कराव्या आणि जागोजागी साजलेले पाणी काढून टाकावे. ३) सध्या अस्तित्वात असलेल्या इमारतींच्या मालकांवर नदी-काठावर झाडे लावण्याची सक्ती करावी, तसेच नदीकाठच्या रस्त्या-कडेने छाया देणारे वृक्ष लावावे. फ) नदीकाठालगत इमारती नव्याने बांधू नयेत आणि जर बांधायच्याच ठरल्या तर त्यांची उंची व स्वरूप काठाच्या सौंदर्यास बाधा आणणारे असू नये. ग) ड्रेनेजचे पाणी नदीत न सोडता ते मलशुद्धीकरण केंद्रांकडे वळवावे. ह) नदी-काठच्या शेतजमिनी, मोकळ्या जागा यांवर औद्योगिक आणि निवासी इमारती होऊ देऊ नये.

३. खडकवासला धरणापासून निघालेले कालवे शहरातून जातात. पूर्वी या कालव्यात पाणी भरपूर होते. त्याभोवती लोकवस्ती दाट नव्हती. तेव्हा कालव्याच्या बाजूंचा फिरण्यासाठी उपयोग होत होता. त्याच्याभोवती झाडेही होती.

पुण्याच्या पूर्वेकडे नदीकाठावर मुळा-मुठा पक्षीअभयप्रदेश आहे. नदीकिनाऱ्यावर आता भरपूर झाडेही लावण्यात आली आहेत. तेथे येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येतही दरवर्षी वाढ होत आहे. नवनवीन पक्षीही तेथे नोंदले जात आहेत. मात्र या प्रदेशाला लागूनच महापालिकेतर्फे स्मशान बांधले जात आहे. पक्ष्यांना या स्मशानाचा फारसा उपद्रव होण्यासारखा नसला तरी पर्यटकांना आणि आजूबाजूच्या रहिवाशांना त्याचा निश्चितच त्रास होईल. पुणे-नगर महामार्गावरच हे स्मशान असल्याने वाहतुकीलाही अडथळा होण्याचा संभव आहे. त्याऐवजी इथे नदीकाठाला लागून पर्यटकांसाठी काही सुविधा निर्माण केल्यास आणि तिथे योग्य अशी झाडे लावल्यास मुळामुठा अभयप्रदेशास पूरक म्हणून त्याचा उपयोग होईल.

आता कालव्यांतून सतत पाणी वहात नाही. जेव्हा वाहते, तेव्हा कालव्याभोवती झालेल्या दाट वस्तीतील लोक त्याचा उपयोग अंग व कपडे धुण्यासाठी करतात. त्या कालव्याचे पाणी पिण्यासाठी वापरले जाते, ते पूर्ण दूषित होऊन जाते.

कालव्यांभोवती झालेली दाट लोकवस्ती पाहता, शहरातून उघडे कालवे नेणे आरोग्यदृष्ट्या अत्यंत घातक आहे. त्यांच्या काठचे रस्ते स्वच्छ राखणे, त्यावर झाडे लावणे हे ही अशक्य आहे. खडक वासल्यापासून पाणी नळाने नेणे फार खर्चाचे असले तरी शहराच्या ज्या भागातून हे पाणी जाते, तेवढ्यापुरते तरी नळ टाकून या पाण्याचा शहरातील जनतेशी संपर्क सध्याप्रमाणे येणार नाही, अशी व्यवस्था करायला हवी. कालव्यातील पाणी अशा रीतीने "भूमिगत" झाल्यावर जी मोकळी जागा उपलब्ध होईल, तिच्या दोन्ही बाजूंना झाडे लावून ते मार्ग निव्वळ फिरण्यासाठी मोकळे ठेवता येतील. या वृक्षीच्छादित मार्गांवर वाहनांना बंदी करून योग्य तो निवांतपणा आणि निर्विघ्नता आणता येईल.

४. पुण्यापासून नजीक पाषाण आणि कात्रज तलावांच्या भोवती हळूहळू बंगले व घरे निर्माण होत आहेत. खरे म्हणजे तलावांच्या सीमांपासून ५०० मीटर अंतराच्या आत अशी बांधकामे होऊ नयेत.

**कालव्याभोवती झालेली दाट लोकवस्ती पाहता, शहरातून उघडे कालवे नेणे आरोग्यदृष्ट्या अत्यंत घातक आहे. त्यांच्या काठचे रस्ते स्वच्छ राखणे, त्यावर झाडे लावणे हे ही अशक्य आहे. खडकवासल्यापासून पाणी नळाने नेणे फार खर्चाचे असले तरी शहराच्या ज्या भागातून हे पाणी जाते, तेवढ्यापुरते तरी नळ टाकून या पाण्याचा शहरातील जनतेशी संपर्क सध्याप्रमाणे येणार नाही, अशी व्यवस्था करायला हवी.**

त्यांच्या सीमांवर झाडे लावली जावीत. हिवाळ्यात येथे अनेक स्थलांतरीत पक्षी पहायला मिळतात. त्यामुळे ही ठिकाणे पर्यटकांना आकृष्ट करू शकतात. झाडे लावणे, पावसाळ्यात त्यांच्या काठाने उगविणारे लांब दांडयाचे गवत राखणे, पक्षी पाहण्यासाठी लाकडी झरोके व मनोरे उभारणे अशा सोयी केल्यास हे तलाव पक्ष्यांसाठी अभयप्रदेश म्हणून राखून ठेवता येतील.

शहरात काही ठिकाणी दगडाच्या खाणी आहेत. त्यांमध्ये पाणी साचून छोटे तलाव निर्माण होतात आणि काही पाणपक्षी तिथे आकृष्ट होतात. अशा जागा म्हणजे-पौड फाटाजवळची दगडाची खाण, पोलीस ग्राऊंडच्या पश्चिमेकडील खाण, कॅम्पातील लाल देवळासमोरची खाण आणि सदर्न कमांडच्या ऑफिसनजीकची खाण या खाणींचा उपयोग सध्या गुरे धुण्यासाठी मुख्यतः होतो. त्यांचे नैसर्गिक स्वरूप कायम ठेवून तेथे उद्याने आणि पाणपक्ष्यांच्या विहाराची स्थाने निर्माण करणे अशक्य नाही. त्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घेणे जरूर आहे.

५. काही रस्त्यांच्या बाजूने भरपूर झाडे लावणे पुण्यात अजूनही शक्य आहे. उदाहरणार्थ, सेनापती बापट रस्त्यांच्या दोन्ही कडांना झाडांच्या दोन किंवा तीन समांतर रांगा लावता येतील. या झाडांच्या छायेमधून पादचारी मार्ग असावा. सध्या रस्ते करताना पादचाऱ्यांसाठी मार्ग बांधण्याकडे लक्ष दिले जात नाही आणि रस्त्याकडेची झाडे रस्तारुंदीत कापली जातात. या झाडांचा पादचारी मार्गांसाठी जास्तीतजास्त उपयोग व्हावा. रेंज हिल रस्ता, पाषाण ते एनडीए रस्ता, पौड फाटा ते बावधन खिंड रस्ता, खडकी ते शिवाजीनगर हा मुंबई-पुणे रस्त्याचा भाग, नातू-बागेपासून कात्रज घाटापर्यंत पुणे-बंगलोर रस्ता, मित्रमंडळ ते अरण्येश्वर, तसेच पर्वती पायथ्यापासून अरण्येश्वरकडे जाणारा रस्ता, बिबवेवाडी, सहकारनगर, कोंढवे खुर्द आणि बोमदेन घाट याकडे जाणारे रस्ते, यांच्या दोन्ही बाजूंनी झाडे लावण्यास वाव आहे.

पुण्यातील काही रस्त्यांच्या बाजूने, जुनी मोठी आणि घटदाट छाया देणारी झाडे आहेत. यांमध्ये गणेशखिंड आणि औंध रस्त्याच्या कडेची झाडे, आर्यभूषण छापखान्यालगतची, एस् एन डी टी कॉलेज ते बावधन खिंड रस्त्यावरची, फर्ग्युसन कॉलेजच्या उद्यानातली, बोटॅनिकल उद्यानातली, ॲग्रिकल्चर कॉलेजमधल्या रस्त्यांच्या बाजूची, वाकडेवाडी जवळची, कोरेगाव पार्कमधल्या रस्त्यांवरची, मंगळदास, एम्प्रेस गार्डन या रस्त्यांकडेची झाडे येतात. पुणे विद्यापीठाचा परिसर याचे महत्त्व निराळेच आहे. दुर्दैवाने चिपळूणकर रस्त्यावरची बहुतेक झाडे रस्तारुंदीत तोडली गेली आहेत. वर उल्लेखिलेल्या रस्त्याकडच्या झाडांची ही अवस्था होऊ नये अशी दक्षता घेतली पाहिजे. शहरात अन्य ठिकाणीही अशी झाडे अथवा वृक्ष-समूह आहेत. "नॅचरल मॉन्युमेंटस्" म्हणून त्यांना संरक्षण दिले पाहिजे.

वर ज्या सूचना केल्या आहेत, त्या अंमलात आल्यास कमीतकमी खर्चात मोकळ्या जागा टिकवून धरता येतील. मात्र त्या अंमलात

आणणे सोपे नाही याची मला पूर्ण जाणीव आहे. काही मोकळ्या जागा अशा आहेत की औद्योगिक व व्यापारी गोष्टींसाठी त्या उपयोगात आणल्यावर खाजगी व्यक्तींना किंवा महानगरपालिकेला त्यापासून उत्पन्न मिळेल. अनेक सुविधा तोटचात चालणाऱ्या महानगरपालिकेला उत्पन्नाचे आकर्षण मोठे असणार. तसेच शहराची लोकवस्ती. औद्योगीकरण, व्यापारीकरण यांच्या वाढीवर काहीच निर्बंध नसतील तर मोकळ्या जागा टिकून राहणे दिवसेंदिवस कठीणच होत जाणार.

शहराची वाढ कोठेतरी थोपवून धरणे आज निकडीचे झाले आहे. ते होणार नसेल तर शहरसुधारणेचे कोणतेही प्रयत्न थोडचाच कालावधीत विफल होतील.

**पुण्याच्या रस्त्यांच्या बाजूने जुनी मोठी व घनदाट छाया देणारी झाडे आहेत तसेच अन्य ठिकाणीही अशी झाडे व वृक्ष समूह आहेत त्यांना 'नॅचरल मॉन्यूमेंट्स' म्हणून संरक्षण दिले पाहिजे.**